ANNEXURE - 47

अमित सानप, तहसिलदार अंबरनाथ यांच्या समोरील कामकाज

क्र.हक्कनोंद/टे-४/तक्रारनोंद ०४/२०१५
तहसिलदार कार्यालय अंबरनाथ
दिनांक :- ४/९/२०१५

१. श्री. गोरखनाथ अनंत खाडे
२. श्री. पांडुरंग लडकु गडगे
३. श्री. बंडु रामचंद्र पाटील
४. श्री. राम दशरथ गडगे
५. श्री. भालचंद्र शंकर खाडे
६. श्री. रघुनाथ लक्ष्मण फराळे
७. श्री. संभाजी गोपाळ गडगे
८. श्री. रविंद्र दशरथ गडगे
९. श्री. बळीराम काळु गडगे
१०. श्री. हरिश्चंद्र पांडुरंग गडगे
११. श्री. गजेंद्र भरत गडगे
रा. मांगरुळ/कीवली, ता.अंबरनाथ,जि.ठाणे

} अर्जदार

विरुध्द

श्रीमती चळबाई हरीश्चंद्र भुगाळ ... सामनेवाले

महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम १९६६ चे कलम १५० अन्वये आदेश

मौजे खरवई येथील खालील वर्णनाच्या जमिनीबाबत

अ.क्र.	गावाचे नाव	सर्व्हे नं	क्षेत्र
१	मौजे खरवई	७	

वरील जमिन मिळकतीबाबत हिस्सा फॉर्म नं. १२ आकारफोड [illegible] नोंद घेतलेल्या फेरफार क्र. १००६ ला अर्जदार यांनी हरकत घेतली असल्याकारणाने सदरची हरकत तक्रार रजिस्टर मध्ये भरुन तलाठी सजा खरवई यांनी या कार्यालयाकडे पाठवली. त्यावर उभय पक्षकारांना नोटीसा काढणेत येऊन सुनावणी लावणेत आली. सुनावणी दरम्यान अर्जदार यांचे वकीलांनी तोंडी युक्तीवाद केला. दोन्ही पक्षकारांनी आपले म्हणणे प्रकरणी दाखल केले. सबब प्रकरण आदेशावर बंद करणेत आले.

अर्जदार श्री. गोरखनाथ अनंत खाडे व इतर १० यांनी आपल्या दिनांक २०/१/२०१५ रोजीच्या अर्जात नमुद केले आहे की, मौजे खरवई येथील स.नं. ७ या मिळकतीची मा. उपनिरिक्षक भूमि अभिलेख यांचेकडील भुमापन /हुकुम रजि.नं. ८१/ मौजे खरवई/२०१४/१४७७ अंबरनाथ दिनांक १३/०१/२०१२ वरुन आपण प्रस्तुत मिळकतीसंदर्भात गावदप्तरी फेरफार क्र. १००६ ची नोंद केली. प्रस्तुत फेरफाराच्या मंजूरीस आमची सक्त हरकत आहे. प्रस्तुत स.नं. ७ संदर्भात जी मोजणी उपअधिक्षक भुमि अभिलेख यांच्याकडून करण्यात

आली त्यावेळी आम्हाला कोणत्याही स्वरुपाची नोटीस देण्यात आली नव्हती. तसेच आमच्या उपस्थितीत सदरची मोजणी झालेली नाही. प्रस्तुत मोजणी नकाशा हा आम्ही कोणीही पाहिलेला नाही. त्यामुळे फेरफार क्र. १००६ च्या मंजूरीस आमची सबळ हरकत आहे.

सामनेवाले श्रीमती चरुबाई हरीश्चंद्र धुमाळ यांनी दिनांक १२/०३/२०१५ रोजी त्यांचे लेखी म्हणणे व तोंडी युक्तीवाद सादर केला की, मौजे खरवई येथील स.नं. ७/१, ७/२, ७/३, ७/४, ७/५, ७/६, ७/७, ७/८, ७/९, ७/१०, ७/११, ७/१२ या पोटहिस्सा मोजणी मो.र.नं. ६७०/२०११ दिनांक १३/०१/२०१२ रोजी करणेत आलेली आहे. मोजणी अंती येणाऱ्या क्षेत्रानुसार सुधारीत आकारफोड तयार करुन गावचहीवाटीच्या उपभोगाकरीता हिस्सा फॉर्म नं. १२ जोडून तलाठी सजा खरवई यांचेकडे कार्यवाहीसाठी पाठविले असता हरकतदार श्री. गोरख अनंता खाडे व इतर १० यांनी दिनांक २०/१/२०१५ रोजी हरकत अर्ज दाखल केला त्यामुळे तलाठी सजा खरवई यांनी नोंदविलेला फेरफार क्र. १००६ हा तक्रार रजिस्टरमध्ये भरुन सादर केले. मी आपणास विनंती करते की, वरील नमुद दावा मिळकतीबाबत नमुना नं. १२ मधील रकाना क्र. ११ मधील कब्जेदारांची नावे अधिकार अभिलेखात घेण्यात यावी. तसेच सुधारीत हिस्सा फॉर्म नं. १२ प्रमाणे अधिकार अभिलेख नोंद करताना धारण क्षेत्राबाबत आम्ही उप अधिक्षक भुमि अभिलेख, अंबरनाथ यांचेकडून मोजणी करुन क्षेत्र निश्चित केलेले आहे. आणि आमचे नावाची नोंद करण्यात यावी. तसेच हरकतदार यांचा हरकत अर्ज फेटाळण्यात येऊन फेरफार क्र. १००६ मंजूर करण्यात यावा.

अर्जदार क्र. १, ५, ८,व ११ यांनी प्रस्तुत प्रकरणात आपले लेखी स्वरुपात म्हणणे दाखल केले की, मौजे खरवई येथील स.नं. ७ या जमिनीत काही हिस्सेदार असून प्रत्येक जण प्रथक मालकी कब्जाने आपआपल्या मालकीच्या क्षेत्रावर क्षेत्रावर काबीज राहून त्या मिळकतीचा उपभोग घेत आहेत प्रत्येक हिस्सेदारांचे ७/१२ उतारे प्रथक असून त्यांचे नावाच्या प्रथक नोंदी महसुली कागदोपत्री आहेत. अर्जदार नं.१ यांचे कुटुंबाच्या मालकी कब्जाच्या क्षेत्राचा स.नं. ७/२ हा स्वतंत्र ७/१२ उतारा असून त्याचे क्षेत्र ०.२१.० आकार ३.६० सदर जमीन कै. अनंता राघो खाडे यांनी मुळ मालक श्री. श्रीनीवास वामन ओक व प्रभाकर वामन ओक यांचेकडून रजिस्टर्ड खरेदीपत्राने खरेदी घेतली होती. त्यांचे मृत्युनंतर सदर जमिनीवर अर्जदार क्र.१ व त्यांचे कुटुंबिय हे वारसांआधारे मालकीने काबीज आहेत.

श्रीमती चरुबाई हरीश्चंद्र धुमाळ आणि मुळ मालक श्री. ओक यांचेच नावाने एकत्रीत ७/१२ उतारा होता व आहे तथापि त्यांचे क्षेत्र प्रथक स्वरुपात सदर पत्रकात नमुद आहे. श्रीम. चरुबाई हरीश्चंद्र धुमाळ हीला तिच्या क्षेत्राचा पोटहिस्सा प्रथक करुन देण्यास म्हणजेच जिचा स्वतंत्र पोटहिस्सा करण्यात काहीच वावगे नाही तथापि मो.र.नं. ६७०/२०११ अन्वये सुधारीत हिस्सा फॉर्म न.१२ तयार करुन सुधारीत आकारफोड करतेवेळी

या आक्षेप अर्जदारांना विनाकारण स.नं. ७/१२ मध्ये कशासाठी घुसवायचे आहे याचे स्पष्टीकरण त्या मोजणी नकाशात नाही आणि अशीजर स्वतंत्र आकारफोड व पोटहिस्सा नकाशा तसेच हिस्सा फॉर्म नं.१२ तयार करण्यात आला तर पुढील काळात गुंतागुंत निर्माण होणार नाही. म्हणून सदर मोजणीवरुन आपूले कार्यालयात मंजूर होण्यासाठी प्रस्तावीत असलेल्या फेरफार नं. १००६ ला अर्जदारांचा तीव्र आक्षेप आहे. दरम्यानचे काळात मुळ मालक श्री. ओक यांनी सदर स.नं. तील जमिनीची विक्री केलेली असल्याने गुंतागुंत वाढण्याची शक्यता आहे. वरील बाबींचा विचार करुन फेरफार क्र. १००६ नामंजूर करुन सदरचे प्रकरण उपअधिक्षक भुमि अभिलेख अंबरनाथ येथे परत पाठवून द्यावे.

प्रकरणी अर्जदार व सामनेवाले यांना दाखल केलेले लेखी म्हणणे अवलोकन केले असता व प्रकरणी दाखल कागदपत्र पाहता असे निदर्शनास येते की, सदर प्रकरणी मौजे खरवई येथील स.नं. ७ या मिळकतीची उपअधिक्षक भुमि अभिलेख यांचेकडील भुमापन /हुकुम रजि.नं. ८१/मौजे खरवई/२०१५/१४६७ अंबरनाथ नुसार मो.र.नं. ६७०/2011 दिनांक १३/०१/२०१२ अन्वये मोजणी केलेली असून सदर मोजणी करतेवेळी कब्जेदार सदरी असलेल्या श्री. गोरखनाथ अनंत खाडे व इतर यांना नोटीस दिल्याचे आढळून येत नाही. त्यामुळे सदरच्या मोजणीस श्री. गोरखनाथ अनंत खाडे व इतर यांची हरकत आहे. तसेच सदर दावामिळकतीत काही ७/१२ धारक हिस्सेदार असून प्रत्येक जण मालकी कब्जाने आपआपल्या मालकीच्या क्षेत्रावर काबीज राहून त्या मिळकतीचा उपभोग घेत आहेत.

सदर प्रकरणी मोजणी करतेवेळी कोणत्याही ७/१२ धारकांची परवानगी घेतलेली दिसून येत नसल्याने सदर मोजणी ही कायद्याला अनुसरुन दिसून येत नाही. तसेच सदर मोजणी करतेवेळी कब्जेदार सदरी असलेल्या श्री. गोरखनाथ अनंता खाडे व इतर यांची नाहरकत प्रकरणी आढळून येत नाही. त्यामुळे सदरची मोजणी ही ग्राहय धरता येत नाही. सबब मी अमित सानप, मला दिलेल्या अधिकारान्वये खालीलप्रमाणे आदेश पारित करित आहे.

-: आदेश :-

१. हरकतदार यांचा हरकतअर्ज मान्य येत आहे.
२. मौजे खरवई येथील स.नं. ७ बाबत हिस्सा फॉर्म नं.१२ आकारफोड पत्रकाबाबत नोंद घेतलेला फेरफार क्र. १००६ नामंजूर करणेत येत आहे.
३. निर्णय सर्व संबंधितांना स्वतंत्रपणे कळविणेत यावा.

(अमित सानप)
तहसिलदार अंबरनाथ

ठिकाण : अंबरनाथ
दिनांक : ११ /०९ /२०१५